# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०७/२०२६ (बुधवार )**

## अवैधरित्या विनापरवाना मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, २१ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, वेलतूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वेलतूर** :— दिनांक १४/०७/२०२६ रोजी वेलतूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने काही इसम अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा जुना नवेगाव रोड आवरमारा शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान स्प्लेंडर प्रो मोटरसायकल क्र. एम एच—४०/ए एल— ८८४४ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता मोहाफुल गावठी दारू मिळुन आली. **आरोपी नामे १) झिबल देवराम चांदेराव, वय ३१ वर्ष, रा. मकरधोकडा, ता. जि. भंडारा २) सचिन सदाशिव ठाकरे, वय ३२ वर्ष, रा. ठाणा पेट्रोलपंप, ता. जि. नागपुर, ह. मु नवेगाव पुर्नवसन** हे अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) ६० लीटर मोहाफूल गावठी हातभट्टी दारु किंमती ६०००/— रुपये २) स्प्लेंडर प्रो मोटरसायकल क्र. एम एच—४०/ए एल— ८८४४ किंमती १५,०००/—रू असा एकुण किंमती २१,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी यांचेविरूध्द पोलीस स्टेशन वेलतूर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पो.स्टे. भिवापुर :— दिनांक १४/०७/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, मौजा कारगाव येथील राणी लक्ष्मीबाई चौकात रामदास बाबा मंदिराजवळ रमेश खडसे हा हातात लोखंडी तलवार घेवून फिरत आहे.त्यामुळे लोकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पंचासमक्ष जावुन पाहणी केली असता एक इसम त्याचे हातात लोखंडी तलवार घेवून फिरतांना दिसला. त्याला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव रमेश दुधाराम खडसे वय ६२ वर्ष रा. कारगाव ता. भिवापूर जिल्हा नागपूर असे सांगितले. नमुद आरोपीच्या ताब्यातुन पंचसमक्ष तलवार जप्त केली.

**आरोपी नामे रमेश दुधाराम खडसे, वय ६२ वर्ष, रा. कारगाव ता. भिवापूर, जिल्हा नागपूर याच्या विरूद्ध पोस्टे भिवापुर येथे कलम ४,२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री,वाहतुक करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १० गुन्हे नोंद

दिनांक १४/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री, वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू तसेच वाहन असा एकुण २४,२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे सचिन बाळकृष्ण शंभरकर, वय ४० वर्ष, २) महिला आरोपी दोन्ही रा. सिध्दार्थ नगर, भिवापुर ता. भिवापुर, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी नामे दिनेश रमेश हिंगणकर, वय ३५ वर्ष, रा. भुयार, ता. पवनी, जि. भंडारा याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे १) झिबल देवराम चांदेराव, वय ३१ वर्ष, रा. मकरधोकडा, ता. जि. भंडारा २) सचिन सदाशिव ठाकरे, वय ३२ वर्ष, रा. ठाणा पेट्रोलपंप, ता. जि. नागपुर ह. मु. नवेगाव पुर्नवसन, ता. कुही, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे सागर

मदनलाल जावरकर, वय २९ वर्ष, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे राम वासुदेव कोहाड, वय ५६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, धापेवाडा कळमेश्वर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे १) देवचंद हरी खंडाते, वय ४० वर्ष, रा. काळाफाटा, तह. पारशिवनी, जिल्हा नागपुर २) पंजाबराव लक्ष्मणराव मलघाम, वय ४५ वर्ष, रा. सत्रापुर, ता. रामटेक, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे १) आरोपी नामे अमरदीप मानसिंग टाक, वय ४६ वर्ष, रा. बानोर चंद्र शिख बेडा, २) नरेंद्र नामदेवराव बन्सोड, वय ६० वर्ष, रा. दावसा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे सुजेश विजय राजपूत, वय २२ वर्ष, रा. सोनमोह, ता. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३९६० मिली देशी दारू, ७५ लिटर मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण २४,२६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने